Time : 1½ Hours **SECOND-TERM** **MARATHI LANG. II**

**Subject Code**

| H | 4 | 4 | 2 | 3 |
|---|---|---|---|---|

**Total No. of Questions : 8** **(Printed Pages : 3)** **Maximum Marks : 40**

**सूचनाएँ :** (i) प्रश्नांचे क्रमांक स्पष्ट लिहा.

(ii) उजव्या बाजूचे अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.

1\. (अ) खालीलपैकी कोणत्याही **एकाचे** संदर्भासह स्पष्टीकरण लिहा : 5

(1) ''काही गेंडे नॅचरल डेथनं मरतात. प्रत्येक वर्षी आम्ही त्यांच्या शिंगाचा लिलाव करतो.''

(2) ''तर त्यावेळी शंभर रुपये द्यावे लागतील.''

(ब) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर **3** ते **4** ओळींत लिहा : 3

(1) आशूचे डोळे दान देण्याचा निर्णय कुणी व का घेतला ?

(2) श्याम आपल्या वडिलांना का टाळतो ?

2\. (अ) खालीलपैकी कोणत्याही **एकाचे** संदर्भासह स्पष्टीकरण लिहा : 5

(1) तुका झालासे कळस । भजन करा सावकास।।

(2) विश्वसलो या तव वचनीं मी,
जगदनुभवयोगें बनुनी, मी,

(ब) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर **7** ते **8** ओळींत लिहा : 4

(1) 'सांगा कसं जगायचं' या कवितेत कवीने कोणता जीवनविषयक दृष्टिकोण मांडलेला आहे ?

(2) 'उष:काल होता होता' या कवितेत कवीने कोणती कैफियत मांडली आहे ?

3. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा :

(1) 'हत्ती <u>तोंड</u> फिरवून <u>आणि</u> शेपूट वर करून धूम ठोकतो.'

(2) 'हत्ती आवेशाने <u>पुढे</u> आला आणि <u>गेला</u>.

4. खालील शब्दांचे वचन बदलून लिहा :

(1) खिडकी

(2) जीभ

(3) खोल्या।

5. खालील शब्दांचे लिंग बदलून लिहा :

(1) गवळण

(2) मांजर

(3) हत्ती।

6. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा :

(1) अनुकूल

(2) अपेक्षित

(3) आदर

(4) उपाय।

7. खाली दिलेल्या 'प' गटातील वाक्प्रचार आणि 'फ' गटातील वाक्प्रचारांचे अर्थ यांच्या योग्य जोड्या जुळवून लिहा : 4

| 'प' | 'फ' |
|---|---|
| (1) कान टवकारणे | अस्वस्थ होणे |
| (2) लग्गा साधणे | लाचार होणे |
| (3) मन सैरभैर होणे | कार्य साधणे |
| (4) ताटाखालचे मांजर होणे | ऐकण्यासाठी सावध होणे |
| | काळजी नसणे |

8. 'रस्त्यावरील भटक्या गुरांची समस्या' या विषयावर दोन मित्र मैत्रिणींमधील संवाद 10 ते 12 ओळींत लिहा. 5